दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक ३०३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.२८ जानेवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# चिरनेर येथील शेतकऱ्यांच्या प्रखर विरोधाने विरार-अलिबाग महामार्गाची मोजणी स्थगित

## आज प्रांत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तातडीच्या बैठकीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

**विरार- अलिबाग कॉरिडोर या बहुउद्देशिय प्रकल्पाच्या भुमापनाला उरणच्या शेतकऱ्यांनी कळंबूसरे येथे प्रखर विरोध करून भूमापन करण्याचे उधळून लावले आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या एकजुटीचा विजय झाला आहे. शेतकऱ्यांच्या एक जुटीचा विजय असो, जमिन आमच्या हक्काची नाही कुणाच्या बापाची, अशा शेतकऱ्यांच्या घोषणांनी चिरनेर परिसर दणाणून सोडला होता.**



विरार-अलिबाग असा बहूउद्देशिय महामार्ग एमएमआरडीए कडून प्रस्तावित होत आहे. हा महामार्ग ठाणे जिल्ह्यातील विरार मधून या महामार्गाला सुरवात केली जात आहे. कल्याण मधून पनवेल, उरण, पेण तालुक्यातून अलिबाग कडे जात आहे. पनवेल मधून ही या महामार्गाला शेतकऱ्यांचा कडाडून विरोध झाला प्रांत कार्यालयासमोर उपोषणेही करण्यात आली होती. त्यात उरण तालुक्यातही या महा मार्गाच्या भूमापनाला प्रखर विरोध झाला आहे.

उरण तालुक्यातील १६ महसुली गावांचा शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन केले जाणार आहेत. त्या साठी शासनाने अधिसूचना ही प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. २७ तारखेला होणार असलेल्या मोजणीच्या नोटिसा शेतकऱ्यांना देण्यात आल्या होत्या मात्र शेतकऱ्यांनी मोजणीला हरकत असल्याचे अर्ज तहसीलदार कार्यालय, मोजणी कार्यालय तसेच प्रांत कार्यालय जिल्हाधिकारी यांना पाठविले होते. मात्र शेतकऱ्यांच्या या अर्जाला न जुमानता तहसीलदार यांनी आज मोजणी साठी सर्व तयारी करून कळंबूसरे येथे सर्व टीम सह हजर झाले होते. यामध्ये मोठ्या संख्येने पोलीस तैनात होते.

मात्र शेकडो शेतकऱ्यांनी या मोजणीला प्रखर विरोध दर्शविला जो पर्यत शासनाकडून आम्हाला आमचे हक्काचा मोबदला जाहीर होत नाही, तोपर्यत आम्ही मो-जणी करू देणार नाही. अशी ठाम भूमिका शेतकऱ्यांनी मांडली शेतकऱ्यांच्या पूर्वापार वडिलोपार्जित जमिनीवर जाणार असल्याने गरीब शेतकरी आपली तहान भूक विसरून या महामार्गाच्या मोजणीला विरोध करीत होते. या मध्ये दुपार होऊनही शेतकरी आपल्या हक्कासाठी भांडत होते. मात्र महसूल आणि शेतकरी यामध्ये सहाय्यक पोलिस आयुक्त भागवत सोनावणे यांनी मध्यस्ती करून या मोजणीवर स्थगिती देऊन आज २८ जानेवारी २०२२ रोजी उपविभागीय आधिकारी यांच्या सोबत पाच महसुली गावांची तातडीची बैठक बोलाविण्यात आली आहे. तर या शेतकऱ्यांना पाठींबा देण्यासाठी जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी, उरण पंचायत समितीच्या उपसभापती शुभांगी पाटील, शिवसेनाप्रमुख तालुका प्रमुख शेतकरी संतोष ठाकूर, उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, माजी सभापती भास्कर मोकल, ॲड.निनाद नाईक, ॲड.प्रशांत पाटील, विक्रांत पाटील, सेवानिवृत्त अधिकारी बाळकृष्ण पाटील, सर्व गावातील सरपंच, उपसरपंच सदस्य आदी शेतकरी शेकडोच्या संख्येने उपस्थित होते.

# सर्वसामान्यांच्या हक्काच्या घरांचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता सिडकोचे योगदान मोलाचे : ना.एकनाथ शिंदे

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**



सिडकोचे गृहनिर्माणातील सातत्य हे वाखणण्याजोगे असून सर्वसामान्य नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता सिडकोने दिलेले योगदान मोलाचे आहे, असे उद्गार श्री. एकनाथ शिंदे, मंत्री, नगरविकास, तथा पालकमंत्री, ठाणे यांनी काढले. सिडको महामंडळाच्या ५,७३० घरांच्या गृहनिर्माण योजनेकरिता, प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला व्हिडिओद्वारे आपला सदिच्छा संदेश देताना त्यांनी हे उद्गार काढले.

सिडको महामंडळाच्या ५,७३० घरांच्या गृहनिर्माण योजनेस ७३ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून २६ जानेवारी २०२२ रोजी प्रारंभ करण्यात आला. या योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस २६ जानेवारी २०२२ पासून सुरुवात झाली आहे. या योजने अंतर्गत नवी मुंबईतील तळोजा नोडमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि सर्वसाधारण प्रवर्गातील नागरिकांकरिता ५,७३० घरे (सदनिका) उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

दर्जेदार बांधकाम, किफायतशीर दर आणि पारदर्शक ऑनलाइन प्रक्रिया यांमुळे सिडकोच्या गृहनिर्माण योजना लोकप्रिय ठरत असल्याचेही श्री. एकनाथ शिंदे यांनी आपल्या संदेशामध्ये म्हटले आहे.

डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी या योजनेविषयी माहिती देताना नवी मुंबईतील वेगाने विकसित होत असलेल्या आणि उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या तळोजा नोडमध्ये परवडणाऱ्या दरातील ५,७३० घरे उपलब्ध करून देत असल्याचे सांगून अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त आज सिडको भवन येथे डॉ. संजय मुखर्जी, यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. श्री. अश्विन मुद्गल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, डॉ. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको तसेच सिडकोचे विभागप्रमुख व अधिकारीदेखील या वेळी उपस्थित होते.

या योजने अंतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या ५,७३० घरांपैकी १,५२४ घरे ही प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी आणि उर्वरित ४,२०६ घरे ही सर्वसाधारण प्रवर्गासाठी उपलब्ध आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील अर्जदार हे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत रु. २.५ लाख अनुदानासाठी पात्र आहेत.

सदर योजनेच्या सर्व प्रक्रिया या पारदर्शक अशा ऑनलाइन पद्धतीने पार पडणार असून त्याकरिता https://lottery.cidcoindia.com हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. या योजनेकरिता २६ जानेवारी २०२२ ते २४ फेब्रुवारी २०२२ या मुदतीत अर्ज नोंदणी करता येणार आहे. ऑनलाइन अर्ज २७ जानेवारी २०२२ ते २५ फेब्रुवारी २०२२ या कालावधीत सादर करता येणार आहेत. तर ऑनलाइन अनामत रकमेचा भरणा करण्याकरिता २७ जानेवारी २०२२ ते २५ फेब्रुवारी २०२२ अशी मुदत देण्यात आली आहे. योजनेची संगणकीय सोडत ११ मार्च २०२२ रोजी पार पडणार आहे. योजनेशी संबंधित पात्रता निकष, घरांचा तपशील, वेळापत्रक इ. सविस्तर माहिती उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तळोजा नोड नवी मुंबईतील वेगाने विकसित होणार नोड आहे. मुंबई-पुणे महामार्ग, रेल्वे आणि सिडकोचा मेट्रो प्रकल्प, यांमुळे या नोडला उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. मेट्रोचे आगार तळोजा येथे असून मेट्रो मार्गेही हा नोड सीबीडी बेलापूरला जोडला जाणार आहे. या नोडमधील काही क्षेत्र हे शाळा, पदवी महाविद्यालये, प्रार्थनास्थळे, रुग्णालये, समाजकेंद्रे, वसतिगृहे इ. सामाजिक उद्देशांकरिता राखीव आहे. मेट्रो रेल्वेच्या स्थानकांलगत वाणिज्यिक उपक्रमांकरिता काही क्षेत्र हे सिडकोकडून निश्चित करण्यात आले आहे. यामुळे तळोजा नोडमध्ये मोठ्या प्रमाणावर वाणिज्यिक संधी निर्माण होणार आहेत. परवडणाऱ्या दरातील घरे, कनेक्टिव्हिटी, रोजगार, वाणिज्यिक प्रकल्प यांमुळे तळोजा नोड हा नवी मुंबईतील वास्तव्यासाठी सर्वोत्तम पर्याय ठरणार आहे.

# तळा नगराध्यक्षपद आरक्षण सोडत जाहीर, यांची लागणार वर्णी?

**दै.रायगड नगरी । तळा**

आज मंत्रालयात राज्यातील नगरपंचायतीचे नगराध्यक्ष पदाचे आरक्षण सोडत काढण्यात आली यामध्ये नुकतीच निवडणूक पार पडलेल्या तळा नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदाचे सर्वसाधारण महिला आरक्षण निघाले आहे. तळा नगरपंचायतीची निवडणूक नुकतीच होऊन १० जागा जिंकत राष्ट्रवादी कॉंग्रेसने स्पष्ट बहुमत मिळवले आहे यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेसची सत्ता नगरपंचायतीवर आली हे निश्चित झाले. खा.सुनील तटकरे यांनी तळा नगरपंचायत निवडणुकीत प्रचारा दरम्यान तळा शहर राष्ट्रवादी कॉंग्रेसचा चेहरा म्हणून चंद्रकांत रोडे यांचे नाव घोषित केले होते अप्रत्यक्षपणे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून रोडे यांचे नाव या निवडणकीसाठी समोर आले. प्रभाग क्रमांक ११ मध्ये राष्ट्रवादी कॅाग्रेसचे उमेदवार चंद्रकांत रोडे हे मोठ्या फरकाने विजयी झाल्याने तेच नगराध्यक्ष होणार अशी चर्चा तळा तालुक्यात रंगली होती त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेससह शिव-सेना, भाजपा, शेकाप पक्षाचे लक्ष नगराध्यक्ष पद आरक्षणाकडे लागले होते.

आज गुरूवारी दुपारी ४ वा मंत्रालय मुंबई येथे राज्यातील नगरपंचायत नगराध्यक्षपद आरक्षण सोडत काढण्यात आली .कोविड प्रादुर्भाव सुरु असल्याने या सोडतीचे दूरदृष्यप्रणाली (V C) द्वारे विभागीय आयुक्तालयात आयोजित केले होते. यावेळी चिठ्ठी द्वारे काढण्यात आलेल्या आरक्षणात तळा नगरपंचायतच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण सर्वसाधारण महिला निघाले आहे. आता राष्ट्रवादी कॉंग्रेसची सत्ता असल्याने नगराध्यक्ष राष्ट्रवादीचाच होणार .../२

# नाविन्यपूर्ण उपक्रम, योजनांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी कटिबध्द : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी शासनाकडून विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वांच्या सहकार्याने येणाऱ्या काळात नाविन्यपूर्ण उपक्रम, योजनांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या सर्वांगिण विकास साधण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज येथे केले.

अलिबाग येथील पोलीस परेड मैदान येथे प्रजासत्ताकदिनाच्या ७२ व्या वर्धापनदिनी मुख्य ध्वजारोहण त्यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषद



अध्यक्षा श्रीम.योगिता पारधी, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, जिल्हा नियोजन अधिकारी ज.द.मेहत्रे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (रोहयो) सुषमा सातपुते, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) श्रीमती स्नेहा उबाळे, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, .../२

## संक्षिप्त...

### सुपरमार्केटस आणि किराणा दुकानांमध्ये वाईन विक्रीला परवानगी मिळणार?

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील सुपरमार्केटस आणि जनरल स्टोअर्समध्ये वाईन मिळण्याचा मार्ग लवकरच मोकळा होणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या गुरुवारी होणाऱ्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब होऊ शकते. त्यामुळे राज्यातील अनेक दुकानांमध्ये वाईन विक्री करता येऊ शकेल. सुपरमार्केटस आणि जनरल स्टोअर्समध्ये विकल्या जाणाऱ्या एक लीटरच्या वाईनच्या बाटलीवर प्रत्येकी १० रुपयांचा अबकारी कर आकारला जाईल. त्यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीत ५ कोटी रुपयांची भर पडेल. तसेच यामुळे सरकारला राज्यात वाईनचा नेमका किती खप होतो, याचीही माहिती मिळू शकेल.

महाराष्ट्रात विक्री होणाऱ्या बहुतांश वाईन्समध्ये मद्याचा अंश अत्यंत कमी असतो. अनेक बेकरीज आणि खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी वाईनचा वापर होतो. सध्याच्या घडीला केवळ मान्यताप्राप्त वाईन शॉपमधून वाईन विक्रीला मुभा आहे. २० वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेल्या या धोरणाचा कालावधी आता संपला आहे. त्यामुळे आता राज्य सरकार यासंदर्भात नवीन कायदा करण्याच्या तयारीत आहे.

# पनवेल तालुक्यात शिवसेनेचा भाजप आणि शेकापला जोरदार धक्का

## ग्रामपंचायत भिंगार-भेरले आदिवासी वाडीतील शेकडो ग्रामस्थ शिवसेनेत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजपा आणि शेकापचे वर्चस्व असलेल्या भिंगार - भेरले ग्रामपंचायत हद्दीतील शेकडो नागरिकांनी नुकतेच आपल्या मनगटावर शिवबंधन बांधले. शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवसेनाप्रमुख तथा राज्याचे पर्यावरण पर्यटन व राज्यशिष्टाचार मंत्री (महाराष्ट्र राज्य) आदित्य ठाकरे आणि उदयोग मंत्री सुभाष देसाई यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होऊन व शिव-सेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल यांच्या विषेश प्रयत्नाने या ग्रामस्थांचा शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश करण्यात आला.

पनवेल तालुक्यात शेतकरी कामगार पक्ष आणि भाजप अशी लढत पाहायला मिळत आहे, मात्र नव्याने समीकरण बदलत चालली आहेत. तालुक्यातील या दोन्ही मातब्बर पक्षांच्या स्पर्धेत आता शिवसेना आणखी .../२

# जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते ध्वजारोहण उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात प्रजासत्ताकदिनाच्या ७२ व्या वर्धापनदिनी ध्वजारोहण जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

यावेळी त्यांच्या पत्नी सौ.कलाराणी महेंद्र कल्याणकर, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, जिल्हा नियोजन अधिकारी ज.द.मेहेत्रे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (रोहयो) सुषमा सातपुते, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) श्रीमती स्नेहा उबाळे, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी चिंतामणी मिश्रा, तहसिलदार विशाल दौंडकर, श्रीमती मिनल दळवी, सतिश कदम, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी गोविंद वाकडे व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्वप्रथम ध्वजारोहणानंतर पोलीस दलाच्या पथकाने राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी प्रजासत्ताकदिनाच्या ७२ व्या वर्धापनदिनानिमित्त उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या.



# वावंजे प्राथमिक आरोग्य केंद्राला लिंडे कंपनीकडून रुग्णवाहिकेची भेट



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील वावंजे प्राथमिक आरोग्य केंद्राला प्रजासत्ताक दिनी रुग्णवाहिकेची भेट देण्यात आली आहे. तळोजा औद्योगिक वसाहतीतील लींडे कंपनीच्या सी एस आर फंडातून ही रुग्णवाहिका देण्यात आली. शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काशिनाथ पाटील आणि रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा योगिताताई पारधी यांच्या प्रमुख उपस्थितीत या रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना काशिनाथ पाटील म्हणाले की तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये जवळपास दोन लाख कामगारांना रोजगार मिळत असतो. या ठिकाणी असणाऱ्या कित्येक कंपन्यांच्यात आम्हा पुढाऱ्यांना जाण्याची कधी संधी देखील मिळत नाही. लींडे या कंपनी व्यवस्थापना सोबत माझा यापूर्वी कुठलाही परिचय नव्हता.

> वावंजे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची देखील प्रशंसा करावी लागेल. जवळपास दोन लाख कर्मचारी या औद्योगिक वसाहतीमध्ये येतात. कोरोना विषाणूचे संक्रमणाला थोपविण्यासाठी लस उपलब्ध झाल्यानंतर या प्राथमिक आरोग्य केंद्राने आजूबाजूच्या गावातील नागरिकांचे लसीकरण तर केलेच शिवाय औद्योगिक वसाहतीमधील जवळपास एक लाख कामगारांचे लसीकरण देखील या केंद्राच्या माध्यमातून झाले आहे.
>
> **- काशिनाथ पाटील**

परंतु कोरोना विषाणूच्या दुसऱ्या लाटेमध्ये जेव्हा वैद्यकीय ऑक्सिजनचा तुटवडा जाणवू लागला तेव्हा ही कंपनी तो ऑक्सिजन बनवत असल्याचे समजले. आज या ठिकाणी कंपनी व्यवस्थापनाचे आणि त्यांच्या .../२

# प्रजासत्ताकाची पोटतिडीक

स्वातंत्र्यदिन आनंदानुभूतीचा असतो, तर प्रजासत्ताकदिन जबाबदारींच्या जाणिवांचा. ७२ वर्षांपूर्वी याच दिवशी आपण राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत परिवर्तन करण्याचा संकल्प केला. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षातील प्रजासत्ताकदिन म्हणून या क्षणाचे महत्त्व थोडे अधिक आहे. लोकांचे राज्य, ही संकल्पना सहजसाध्य नसते. कोणताही देश आव्हानांनीच समृद्ध होतो. घटनेचा स्वीकार केला, तेव्हा देशापुढील समस्यांचे स्वरूप जटील होते. आताही ते पुरते बदलले असे नाही. उलट गुंडपुंडांच्या संघटीत हातमिळवणीने सामान्यांच्या जीवनप्रेरणा क्षीण ठरू लागल्या आहेत. समस्यांचा आगडोंब शमायला तयार नाही. खलपुरुषांच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या आहेत. सत्प्रवृत्तींचा क्षणोक्षणी कस लागतो आहे. लोकशाहीच्या अंगीकाराने साहजिकच 'व्यक्ती'च्या अधिकारांची व्याप्ती वाढली. सामूहिक शहाणपणाचा शोध संपलेला नाही. विवेकाच्या मार्गात अडचणींचा डोंगर आहे. देश म्हणून विकासाचा टप्पा ओलांडायला बरेच मार्गक्रमण करावे लागेल. सध्याचे भवताल तसेच आहे. प्रजासत्ताकाने सामान्यांच्या झोळीत मोहरून जाण्याचे क्षणही दिले. संरक्षण, शिक्षण आणि मूलभूत विकासाच्या क्षेत्रात भरीव काम झाले. संरचनात्मक घडण सुरळीत व्हावी, यासाठी गंभीर प्रयत्न झाले. मूळ चिंता आहे ती सुबुद्ध समाजाच्या खंबीर भूमिकांची. प्रजासत्ताक दिवसाचे चिंतन करताना, या निकषावर भारतीयांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या असल्याचे नाकारता येणार नाही. लोकशाहीच्या चारही स्तंभाचे तारू भरकटू न देण्याचा पुकारा सातत्याने होतो. राजकीय दृढतेतून हिंसाचारावर मात करण्याच्या गर्जना होतात. प्रत्यक्षात हिंसेतून राजकीय पोळी भाजून घेण्याचे प्रकार अंगवळणी पडले आहेत. शिक्षण क्षेत्राची दारे धनवंतांच्या ओसरीत उघडली आहेत. सर्वांगीण आर्थिक संपन्नतेचा घोषा कुचकामी ठरला आहे. सामाजिक क्षेत्रातील अवस्था भयकंपित करणारी आहे. विकासाची लोकशाही चौकट स्वीकारल्यानंतरही, आपण ना गरिबीच्या राक्षसाचे उच्चाटन करू शकलो, ना आरोग्य सेवांचे सशक्त विकेंद्रीकरण. अलीकडील जातीय आणि धार्मिक विषमतेने तर विवेकी मनांपुढे प्रश्नांचे मोहोळ उभे केले आहे. घटनादत्त संरक्षणाचा गाजावाजा होत असतानाही, जातपंचायतींचा जाच संपलेला नाही. मागील सत्तर वर्षांत लोकशाही सुदृढ झाली, की जातिअंताच्या घोषणा देत हा डोलारा खिळखिळीत करण्याचे प्रयत्न झाले, याची चाचपणी व्हायला हवी. विज्ञानवादाचे सार्वत्रीकरण करताना, एकविसाव्या शतकात आचरणातील सखोल सुधारणावाद अपेक्षित आहे. वरच्या आणि खालच्या अशा दोन्ही श्रेणींना एका रेषेत आणण्याचे स्वप्न घटनाकारांनी बघितले होते. आपण दरी मिटवू शकलेलो नाही. राजकारणात समता दिसली, तरी सामाजिक आणि आर्थिक आयुष्यात विषमतेचा प्रत्यय येईल, असा धोका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वर्तविला होता. त्यांच्या विचारांमागे कळकळ होती. राजकारणात समता झळकेल, मतांच्या मूल्यांना मान्यता दिली जाईल; मात्र सामाजिक आणि आर्थिक जीवनात माणसाचे समान मूल्य नाकारण्याचे प्रकार घडतील, अशी भीती त्यांना होती. त्यांचा अंदाज खोटा ठरविण्याची संधी प्रजासत्ताकात राहणाऱ्या नागरिकांनी घालवली आहे. भारतीय घटनेत श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र्य आहे. दर्जा आणि संधीची समानता देखील. मानवतेला दिलेला तो दागिना आहे. वास्तविकता भिन्न आहे. अभिव्यक्तीच्या नावाखाली चालणारा सुखनैव संचार चकित करतो. विश्वासाला नख लावले जाते. सर्वंकष विकासाच्या योजनांसाठी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये समन्वयाचा पुढाकार नगण्य झाला आहे. पुढाऱ्यांचेच चुकते असेही नाही. मेंढरेपण नाकारण्यास बहुतांश सामान्यांनी दिलेला नकार, ही अधिक चिंतेची बाब आहे. सिनेमा, क्रिकेट आणि क्राइम या तीन 'सी' मध्ये सामान्यजनांचे गुंतणे आश्चर्यकारक आहे. 'क्रॉप' हा चौथा 'सी' त्यातून गौण ठरतो आहे. उत्तरे शोधण्याचा ध्यास असला, की अंतरांच्या सीमा ठिसूळ ठरतात. कृषिप्रधान देशातील शेतकऱ्यांच्या विवंचनांवर संसदेतील तोडग्यास झालेला विलंब वेदनादायी ठरतो. प्रजासत्ताकाने चर्चेचे सर्व उपाय पुरविल्यानंतरही, आंदोलनातील दीर्घता लोकशाहीवादी देशातील संवेदनशील नागरिकांना खजील करते. आंदोलनांनी कार्यकर्ते घडतात. कालबद्ध निर्णयांमधून नेत्यांचे द्रष्टेपण ठरते. प्रत्येकाने उणिवा शोधायला हव्यात. राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक, शैक्षणिक आणि आध्यात्मिक क्रांतीखेरीज भारतात बदल अशक्य असल्याची लोकनायक जयप्रकाश नारायण यांची श्रद्धा होती. आध्यात्मिक म्हणजे धार्मिक नव्हे, ही नवी जाणीवही निर्माण करायला हवी. येत्या वर्षात भारताला संसदेची नवी इमारत लाभणार आहे. ही 'लोकांची संसद' असेल, असा दावा केला जातो आहे. संसदेच्या निर्मितीसोबतच जनसामान्यांच्या प्रश्नांकडे आस्थेने बघण्याची पोटतिडिकही राज्यकर्त्यांमध्ये निर्माण व्हावी, अशी आशा आपण करू या.

# पनवेल महानगरपालिकेच्यावतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वातंत्र्यसैनिक व त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांचा गौरव



**दै.रायगड नगरी । पनवेल**

देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असल्याच्या निमित्ताने आज प्रजासत्ताक दिनानिमित्त स्वातंत्र्यसैनिक आणि त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांचा सत्कार महापालिकेतर्फे करत असतानाच तुमची ओळखपत्राची मागणी पूर्ण करत आहोत असे महापौर डॉ कविता किशोर चौतमोल यांनी सांगितले.

आज हुतात्मा स्मारकात महापालिकेच्यावतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने स्वातंत्र्य चळवळीतील अनसंग हिरो यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी राहूल मुंडके, महापौर डॉ कविता किशोर चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, प्रभाग समिती'ड'च्या सभापती वृषाली वाघमारे आयुक्त गणेश देशमुख, तहसीलदार विजय तळेकर उपस्थित होते. उपस्थितांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. यावेळी सुमारे ३० स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांना ओळखपत्र, शाल, श्रीफळ, भेट वस्तू देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच जेष्ठ नागरिक माजी नगरसेवक अशोक खरे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी पालिका नगरसेविका, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त डॉ.वैभव विधाते, आयुक्त सुवर्णा दखणे पालिका कर्मचारी, जेष्ठ नागरिक, पत्रकार उपस्थित होते. हुतात्मा स्मारकात उपविभागीय अधिकारी राहूल मुंडके, महापौर डॉ कविता किशोर चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, पालिका नगरसेविका, आयुक्त गणेश देशमुख, तहसीलदार विजय तळेकर यांच्या उपस्थितीत स्वातंत्र्य वीरांच्या नातेवाईक सुनिता दत्तात्रय गोखले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच रायगड सुरक्षा रक्षक मंडळाच्या जवानांनी ध्वजाला मानवंदना दिली.

# सततचे खराब हवामान व कोरोना महामारीमुळे मच्छिमार बांधव फार मोठ्या आर्थिक अडचणीत

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

सततचे खराब हवामान व कोरोना महामारी यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील मच्छिमार बांधव फार मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे. २०२० साली मार्च महिन्यामध्ये देशामध्ये लॉकडाऊन जाहीर करण्यात आला. त्यानंतर मच्छिमार बांधवांना मच्छी मिळत असून देखील मच्छीला मागणी नसल्यामुळे मच्छिमारी करणे थांबवावे लागले होते. त्या नंतर ३ जून २०२० रोजी निसर्ग चक्रीवादळाचा तडाखा श्रीवर्धन तालुक्याला मोठ्या प्रमाणात बसला. कारण या चक्रीवादळाचा लँडफ़ॉलच श्रीवर्धन व हरिहरेश्वर समुद्रकिनारी झाला.

या वादळामध्ये तालुक्यातील जवळजवळ ९० टक्के लोकांच्या घरावरील छपरे उडून गेली होती. त्याचप्रमाणे जीवना कोळीवाडा, मुळगाव कोळीवाडा या ठिकाणीदेखील कोळी वस्तीमध्ये घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यानंतर २०२० साली वातावरणातील सतत होणाऱ्या बदलामुळे जवळजवळ महिन्यातून एकदा तरी पाऊस पडून हवामान खराब होत होते. समुद्र खवळल्या सारखा झाल्यानंतर मच्छीमारांना नाइलाजाने आपल्या बोटी काळींजे खाडीमध्ये आणून नांगरून ठेवाव्या लागतात. २०२० साल कोरोना महामारी व खराब वातावरण असताना २०२१ सालच्या मे महिन्यामध्ये १६ व १७ तारखेला पुन्हा एकदा तोक्ते चक्रीवादळाने कोकण किनारपट्टीला जोरदार तडाखा दिला. यानंतर पावसाळ्यात शासकीय नियमाप्रमाणे मच्छीमारी दोन महिने बंद होती. त्यानंतर मच्छीमारी हंगाम सुरू झाल्यानंतर देखील सतत समुद्र खवळल्याचे वातावरण असल्यामुळे मच्छिमारांना मच्छीमारी करता आली नाही. २०२१ संपून गेल्यानंतर २०२२ मध्ये सुद्धा जानेवारीच्या वीस ते पंचवीस तारखे दरम्यान अतिशय खराब हवामान असल्यामुळे मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा देण्यात आला होता. त्याचप्रमाणे डिझेलचे वाढलेले भाव व मच्छीमाराना योग्य मिळत नसलेला भाव यामुळे मच्छीमार बांधव पूर्णपणे त्रस्त झाल्याचे पाहायला मिळत आहे. शासनाकडून मात्र मच्छीमार बांधवांना ठोस अशी मदत अद्याप देण्यात आलेली नाही. तरी शासनाने सतत खराब हवामानामुळे नुकसान सोसणाऱ्या मच्छीमार बांधवांना मदतीचे पॅकेज लवकरात लवकर जाहीर करावे. अशी मागणी मच्छीमार बांधवांनी मधून केली जात आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## तळा नगराध्यक्षपद आरक्षण सोडत जाहीर, यांची लागणार वर्णी?

हे निश्चित झाले असुन या पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस कडून सौ.अस्मिता भोरावकर यांची निवड होण्याची शक्यता आहे. तसे या पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस इतर नगरसेविका ही इच्छुक आहेत मात्र आता खा.सुनील तटकरे, आ.अनिकेत तटकरे हे कोणाला पसंती देतात यानंतर कळेल मात्र अनुभवी निष्ठावंत नगरपंचायत माजी विरोधी पक्ष नेते चंद्रकांत भोरावकर यांच्या सौभाग्यवती सौ. अस्मिता भोरावकर यांचीच वर्णी लागण्याची शक्यता जास्त आहे.

## जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी कटिबध्द : ना.आदिती तटकरे

उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे, जिल्हा कृषी अधीक्षक श्रीम.उज्वला बाणखेले, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जगदीश सुखदेवे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी चिंतामणी मिश्रा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, डॉ.ज्ञानदा फणसे, मुख्य वित्त लेखा अधिकारी घाडगे, जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक, उप वनसंरक्षक आशिष ठाकरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस. हरळय्या, व्यवस्थापक श्यामकांत चकोर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, तहसिलदार विशाल दौंडकर, श्रीमती मिनल दळवी, सतिश कदम, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी गोविंद वाकडे, प्रवीण बोणे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम ध्वजारोहणानंतर पोलीस दलाच्या पथकांनी राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. त्यानंतर पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी स्वातंत्र्यदिनाच्या ७२ व्या वर्धापनदिनानिमित्त जिल्ह्यातील सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्याप्रसंगी उपस्थितांना संबोधीत करताना पालकमंत्री कु.आदिती तटकरे म्हणाल्या की, विविध धर्म, भाषा, प्रांत, संस्कृती जोपासणाऱ्या भारतीयांचा जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारा आपला भारत देश. आपण साजरा करीत असलेला प्रजासत्ताक दिन हा लोकशाहीचा उत्सव असून विविध प्रयत्नांमुळे आपली लोकशाही अधिकाधिक मजबूत होत आहे. सर्व मतदारांनी राष्ट्रीय कर्तव्य भावनेतून मतदानात सहभाग घेणे आवश्यक आहे. तसेच स्वत:बरोबर इतर नागरिकांना मतदानाच्या कर्तव्यासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.

## पनवेल तालुक्यात शिवसेनेचा भाजप आणि शेकापला जोरदार धक्का

दोन पावले पुढे जात आहे. सर्वप्रथम ग्रामीण भागातील नागरिक हे मोठ्या प्रमाणावर शिवसेनेत दाखल होत आहेत. यावेळी शिवसेना उप शहर प्रमुख नारायण फडतरे, ज्ञानेश्वर भंडारी, शाखाप्रमुख संदिप घोगरे, शिवसैनिक रोशन कडव, अरूण पाटील, रविन्द्र भोपी आदि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वावंजे प्राथमिक आरोग्य केंद्राला लिंडे कंपनीकडून रुग्णवाहिकेची भेट

तमाम कर्मचाऱ्यांचे मी आभार मानतो कारण त्यांनी प्रचंड कष्ट घेऊन वैद्यकीय ऑक्सिजन निर्माण केला व तो महाराष्ट्रासह अन्य राज्यांतील हॉस्पिटल्सना देखील पुरवला. वावंजे प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिका ही जुनी झाली होती त्यामुळे तिच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च करणे देखील अवघड होऊन बसले होते. या कंपनीने योग्य वेळी योग्य भेट प्राथमिक आरोग्य केंद्राला दिली आहे. परिसरातील नागरिकांसाठी ही रुग्णवाहिका लाभदायी ठरेल.

सरपंच डी बी म्हात्रे म्हणाले की कंपनी व्यवस्थापनाने प्रस्ताव जाताच तातडीने त्याला होकार दिला व आज प्रजासत्ताक दिनी रुग्णवाहिकेचे लोकार्पण देखील झाले त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा योगितताई पारधी म्हणाल्या की ही रुग्णवाहिका रुग्णांना आणि विशेष करून महिला रुग्णांना जास्त लाभदायी ठरेल. गरोदर मातांना या ठिकाणी रिक्षा अथवा खासगी वाहनांतून आणावे लागते अशा रुग्णांना देखील ही रुग्णवाहिका लाभदायी ठरेल. त्या पुढे म्हणाल्या की जिल्हाधिकारी डॉक्टर महेंद्र कल्याणकर यांना देखील लिंडा कंपनीने दिलेल्या रुग्णवाहिकेचे बद्दल कळविले त्यांनीदेखील कंपनी व्यवस्थापनाचे आभार मानत असल्याचा निरोप माझ्याकडे सुपूर्द केला आहे.

कंपनीचे विभागीय व्यवस्थापक एन के पवार यांनी कोरोना कालखंडात कंपनीने केलेल्या नेत्रदीपक कामगिरी बाबत उपस्थितांना अवगत केले. ते पुढे म्हणाले की समाजाप्रती असलेल्या आमच्या उत्तरदायित्वमध्ये आम्ही कधीही कसूर होणार नाही.जेव्हा-जेव्हा समाजाला कंपनीची गरज लागेल तेव्हा तेव्हा कंपनी सकारात्मक दृष्टीने त्या सगळ्या प्रस्तावांचा विचार करेल. या रुग्णवाहिकेचा वापर येथील ग्रामस्थांना करता येईल याचे आम्हाला समाधान वाटते.

रुग्णवाहिकेच्या लोकार्पण सोहळ्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काशिनाथ पाटील, रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा योगितताई पारधी, लिंडा कंपनीचे विभागीय प्रमुख रंगनाथन, विभागीय व्यवस्थापक एन के पवार, अमरिंदर सिंग, वावंजे ग्रामपंचायतीचे सरपंच डी बी म्हात्रे, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर राज चव्हाण, आरोग्य सहाय्यक तानाजी जाधव, योगिता गुरव, कनिष्ठ सहाय्यक दत्तात्रेय चोरघे, ग्रामस्थ, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


अॅड.भुपेश पेमारे

### जाहीर नोटीस

कर्जत येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज १६/२०२२
ने.ता. २१/०२/२०२२

श्रीम.अनुसया गणेश वाघ — अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत कशेळे — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती कै.गणेश परशुराम वाघ यांचा मृत्यू मौजे : कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड येथे ग्रुप ग्रामपंचायत कशेळे यांचे हद्दीत दि.०१/०८/२०१४ रोजी झालेला आहे. अर्जदार यांचे पती कै.गणेश परशुराम वाघ यांचे मृत्यूची नोंद प्रचलित नियमानुसार एक वर्षाचे आत होणे अनिवार्य होते. मात्र अर्जदाराचे कुटुंबियांचे अज्ञानामुळे व काही कारणास्तव त्यांचे पतीची मृत्यूची नोंद मुदतीत करणेची राहून गेली आहे. त्यामुळे अर्जदारांनी त्यांचे पतीची मृत्यूची नोंद प्रचलित नियमानुसार सामनेवाले यांचे दप्तरी नोंदणी रजिस्टर्डला करून तसा मृत्यू दाखला सामनेवाल्यांनी अर्जदारांना द्यावा असा हुकूम होणेकरिता अर्जदारांनी प्रस्तुतचा चौकशी अर्ज या मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. सबब अर्जदार यांचे अर्जास जर कोणाचीही कसलेही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ती हरकत आमचेकडे लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेवून योग्य वाटल्यास अर्जदारांचे लाभांत योग्य तो निर्णय देईल. मागाहून आलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही. आज दि.२५/०१/२०२२ रोजी आमचे सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, कर्जत** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, कर्जत**

अॅड.आबिदा हकीम

### जाहीर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

क्रि.चौ.अर्ज क्र.७५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता. २८/०२/२०२२

अकील युसुफ दाखवे — अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत कर्नाळा
मु.तारा, पो.बारापाडा, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार अकील युसुफ दाखवे ह्या दि.०१/०६/१९५७ रोजी मौजे : बारापाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी जन्म झाला असून त्यांची जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत कर्नाळा यांच्याकडे झाली नसल्याने त्यांच्या जन्माच्या नोंदीकरिता अर्जदार अकील युसुफ दाखवे स्वतः प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब पनवेल यांच्या कोर्टात सदरचा चौकशी अर्ज दाखल केला असून त्याच्या जन्माच्या नोंदणीबाबत कोणत्याही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रत्यक्ष हरकती घेतल्या गेल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची लागलीच कारवाई करेल आणि ते जर अकील युसुफ दाखवे ह्यांच्या जन्माचा दाखला घेण्यास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांच्या जन्माच्या नोंदणीचा अर्ज मंजूर करेल याची दखल घ्यावी.

आज दि.२५/०१/२०२२ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

**सही/- सहा.अधिक्षक प्रथमवर्ग न्या.सो.पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक प्रथमवर्ग न्या.सो.पनवेल**

मा.गोडसे सो.
अॅड.सुजाता पाटील

### जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ. अर्ज नं.१९७७/२०२१
ने.ता. ०५/०३/२०२२

श्रीमती.पुष्पा विष्णू सावंत इतर दोन — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अ.नं.२ व अ.नं.३ यांचे वडील कै. श्री.विष्णू गणपत सावंत हे दि.२२/०२/२०२१ रोजी हिरानंदानी फोर्टीस हॉस्पिटल, वाशी नवी मुंबई येथे मयत झाले. मयत कै.श्री.विष्णू गणपत सावंत यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्ता परिशिष्ट**

**अ) (५० टक्के भाग)**

**सदनिका नं.३०३, श्री कृष्ण सीएचएस, प्लॉट नं.३, अभ्युदय बँके समोर, सेक्टर १६, कामोठे, नवी मुंबई, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६**

**एकूण क्षेत्रफळ : ७९.८५ चौ.मी. बिल्टअप व ११.००१ चौ.मी. टेरेस**

**ब) (१०० टक्के भाग)**

**सदनिका नं.३१, आठवा मजला, टाईप १ ए, एअर इंडिया नेरुळ कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. : प्लॉट नं.२४, सेक्टर २७, सीवूड, नेरुळ, नवी मुंबई**

**एकूण क्षेत्रफळ : ११७४ चौ.फूट. बिल्टअप**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रांसहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२७/०१/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


मा.मुजावर साहेब कोर्ट

प्रोसेस जमा रु.५०/- — अॅड.समाधान काशिद, कामोठे, अर्जदारतर्फे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात पनवेल

दि.चौ.अर्ज क्रं.२००८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता. २८/०२/२०२२

सुनिता पोपट कोंढाळकर आणि इतर — अर्जदार
विरुद्ध
सुमन धोंडीबा कोंढाळकर — सामनेवाले

ज्याअर्थी कै.पोपट धोंडीबा कोंढाळकर हे दि.२९/१२/२०२० रोजी क्रिटीकेअर हॉस्पिटल, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिका क्रं.बी/४०२, चौथा मजला, बी विंग, कोमल अपार्टमेंट, प्लॉट नं.१३, सेक्टर नं.९, कामोठे, ता.पनवेल, जिल्हा : रायगड.**

**त्याचे क्षेत्रफळ ४६.९३ चौ.मी. बिल्टअप**

कै.पोपट धोंडीबा कोंढाळकर यांस अर्जदार व सामनेवाले हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार यांनी वारस दाखला मिळावा म्हणून अर्ज केला आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार व सामनेवाले यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला दिला जाईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

तारीख २७/१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.गोडसे सो.
वकील दिप्ती देशमुख

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) पनवेल यांच्या न्यायालयात

अर्ज क्रं.१९४१/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता. ०७/०२/२०२२

श्रीमती.मेरी बेरेटो
रा.फ्लॅट नं.२०२, मौसम सीएचएस, प्लॉट नं.२८५,
सेक्टर २८, वाशी, नवी मुंबई-४००७०३ — अर्जदार
विरुद्ध
१) सुश्री मेलिसा बेरेटो
२) श्री एलिस्टर बेरेटो — गैर अर्जदार

वरील अर्जदार यांचे पती व गैर अर्जदार यांचे वडील श्री.एलकैन्डर बरेटो यांचे दि.१ ऑक्टोबर २०२१ रोजी वाशी, नवी मुंबई येथे निधन झाले. त्यांचे संयुक्त नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**१) फ्लॅट नं.बी-७०१, सातवा माळा, इंद्रविहार रेसिडेन्सी, प्लॉट नं.१८, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९**

**२) फ्लॅट नं.टी-८, २६०५, २६ वा माळा, टॉवर क्र.८, अनन्या बिल्डींग, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर (पूर्व), मुंबई-४०००७४**

**३) प्लॉट नं.११ (एन ए प्लॉट), गट क्र.५७३, गाव : म्हसा, तालुका : मुरबाड, जिल्हा : ठाणे**

**४) प्लॉट नं.१२ (त्यावरील निर्माणा सहीत) गट क्र.५७३, गाव : म्हसा, तालुका : मुरबाड, जिल्हा : ठाणे**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने मा.पनवेल न्यायालयात वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केला असून सदर मिळकतीबाबत कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अगर हरकत असल्यास सदरहू नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत या न्यायालयात व्यक्तीशः किंवा वकीलामार्फत हजर राहून आपली लेखी हरकत दाखल करावी. सदर मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास यांच्या विनंती वरुन वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२७/०१/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## माणगांवात ७२ वा प्रजासत्ताक वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

भारतिय प्रजासत्ताक दिनाचा ७२ वा वर्धापन दिन समारंभ जुने तहसीलदार कार्यालयानजिकच्या पोलिस परेड मैदानावर बुधवार २६ जानेवारी रोजी सकाळी ९.१५ वाजता माणगांवच्या प्रांताधिकारी प्रशाली जाधव/दिघावकर यांचे शुभहस्ते पार पडला. सर्वप्रथम भारतिय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक शपथपूर्ण वाचन करुन ७२व्या भारतिय प्रजासत्ताक दिनी राष्ट्रीय तिरंगा डौलाने फडकवून, पोलीस पथ संचलनात राष्ट्रीय मानवंदना देत राष्ट्रगीत म्हणत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी माणगांवचे पोलीस उप-विभागिय अधिकारी प्रविण पाटील तसेच वरिष्ठ पोलीस निरिक्षक अश्वनाथ खेडकर, नगरपंचायतचे मुख्याधिकारी राहुल इंगळे, नायब तहसिलदार भाबड तसेच शिवसेना नेते राजीव साबळे नवनिर्वाचित नगरसेविका शर्मिला सुर्वे, ममता थोरे, हर्षदा सोंडकर, जेष्ठ सामाजिक नेते संजय अण्णा साबळे, अनेक प्रशासकिय अधिकारी, सेवानिवृत्त अधिकारी, महिला पुरुष, शालेय विद्यार्थी, अनेक मान्यवर माणगांवकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## देवकान्हे येथे १५ वर्षे वयोगटातील मुलांचे लसिकरण कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रेहा**

रोहे तालुक्यातील देवकान्हे ग्रा.पंचायतीचे वतीने १५ वर्षे वयोगटातील मुलांना कोरोना प्रतिबंधक लसीकरणाचा पहिला डोस देऊन लसिकरणाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न करण्यात आला. येथील सरपंच तथा रायगड भूषण लोकशाहीर वसंत भोईर यांचे प्रयत्न व सहकार्यातून सदर लसिकरण मोहिम यशस्वीरीत्या संपन्न करण्यात आली. यावेळी उपसरपंच सूरज कचरे, ग्रा.पं.सदस्य दयाराम भोईर, निलिमा भोईर, रिया भोईर, पार्वती पवार, प्रा.शाळा देवकान्हे मुख्याध्यापक सचिन टिकूले, उपशिक्षक विठ्ठल हाके आदी उपस्थित होते.

# शुक्रवारपासून पनवेलमध्ये राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा महाअंतिम फेरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आठव्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी २८ ते ३० जानेवारी पर्यंत पनवेलमध्ये होणार आहे.

कोरोना संदर्भात नियमांचे पालन करून पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात हि स्पर्धा होणार असून कोरोना प्रतिबंधात्मक लसीचे दोन डोस घेतलेल्या व्यक्तींनाच प्रवेश असणार आहे. या स्पर्धंच्या महाअंतिम फेरीचे उदघाटन शुक्रवार दिनांक २८ जानेवारी रोजी तर पारितोषिक वितरण रविवार दिनांक ३० जानेवारीला होणार आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या स्पर्धेकरिता प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक नितिन चंद्रकांत देसाई, तर पनवेल महानगरपालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख यांची सन्माननीय उपस्थिती असणार आहे.

यावेळी सुप्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते विजय केंकरे, सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, सुप्रसिद्ध लेखक व अभिनेता संजय मोने, सुप्रसिद्ध लेखक डॉ.नितीन आरेकर, सुप्रसिद्ध अभिनेता भरत सावले, सुप्रसिद्ध उद्योजक विलास कोठारी, स्पर्धेचे ब्रँड अँबेसिडर सुप्रसिद्ध अभिनेते ओमकार भोजने यांची उपस्थिती असणार आहे.

मराठी रंगभूमीला समृद्ध करणारे मान्यवर व्यक्तींचा या वर्षीपासून जीवन गौरव स्वरूपात 'गौरव रंगभूमीचा' हा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार असून यंदा या पुरस्काराने ज्येष्ठ दिग्दर्शक प्रकाश बुद्धीसागर यांना सन्मानित करण्यात येणार आहे. ५० हजार रुपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे स्वरूप पुरस्काराचे असणार आहे. तर या स्पर्धेतील प्रथम क्रमांकास ०१ लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेचा नाट्य रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष व महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, स्पर्धा सचिव श्यामनाथ पुंडे, सिकेटी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एस.के. पाटील यांनी केले आहे. नाटय चळवळ वर्द्धींगत करण्यासाठी व नाटय रसिकांना आपले नाटयाविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वर्द्धींगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष व महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांनी 'अटल करंडक एकांकीका' या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व निटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परिक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असून आता पर्यंत झालेल्या या स्पर्धेला रमेश सिप्पी, प्रेमानंद गज्वी, गंगाराम गव्हाणकर, जयंत सावरकर, जयवंत वाडकर, केदार शिंदे, अंकुश चौधरी, जयवंत वाडकर, आदिती सारंगधर, किरण जुनेजा, प्रदीप मुळे, राजन ताम्हणे, समीर खांडेकर, राजन भिसे, शर्वाणी पिल्ले, क्रांती रेडकर, विजय चव्हाण, विजय कदम, विजू खोटे, अविनाश खर्शीकर, संजय नार्वेकर, ऋतुजा देशमुख, मनोज जोशी अशा नाट्य व सिनेसृष्टीतील अनेक दिग्गजांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले आहे.

## माथेरान प्रशासनाकडून पर्यटन दिवस साजरा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

शासनाच्या आदेशानुसार २५ जानेवारी रोजी माथेरान नगरीच्या उत्तम प्रशासक तथा कार्यशील मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समस्त नगरपरिषदेच्या कर्मचारी वृंदाच्या सहकार्याने राष्ट्रीय पर्यटन दिन मोठया उत्साहात आणि आनंदाने साजरा करण्यात आला.

निसर्ग संस्कृती आणि यजमान यांचा करू सन्मान, पर्यटनाच्या नवं कौशल्यातून वाढवू माथेरान सह देशाची शान ह्या बिरुदावलीला अनुसरून उत्तम प्रशासक सुरेखा भणगे-शिंदे यांच्या पुढाकाराने नगरपरिषदेच्या माध्यमातून येणाऱ्या पर्यटकांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.यामध्ये प्रामुख्याने पर्यटकांसाठी सकाळी दहा वाजता हुतात्मा स्मारक ते नौरोजी उद्यानापर्यंत मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती यामध्ये स्थानिक शालेय विद्यार्थ्यांसह नागरिकांनी आपला सहभाग नोंदवला. दुपारी तीन वाजता माथेरानची शान समजल्याजाणाऱ्या अश्वांच्या शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर सायंकाळी चार वाजता अश्वांचा फॅशन शो चा नेत्रदीपक कार्यक्रम सादर करण्यात आला होता त्यास पर्यटकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत नगरपरिषदेच्या या सर्व स्तुत्य उपक्रमांचे कौतुक केले. नौरोजी उद्यानात राष्ट्रीय मतदान दिवसा निमित्ताने शपथ कार्यक्रम घेण्यात आला. राष्ट्रीय मतदान दिवस आणि राष्ट्रीय पर्यटन दिनानिमित्त स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्वांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.



यावेळी सर्वपक्षीय प्रतिनिधी तसेच माजी लोकप्रतिनिधी, नागरिक, पर्यटक यांचे मनोगत आणि त्यानंतर सुप्रसिद्ध गायक चंद्रकांत काळे आणि मित्र मंडळ यांचा सुश्राव्य गायनाचा कार्यक्रमाने सर्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले या कार्यक्रमात नगरपरिषदेचे कार्यालय अधीक्षक रत्नदीप प्रधान यांनीही आपला मिलिटरी मधील दिवंगत मित्र विनय धनावडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी एक मैत्री गीत सादर केले. यावेळी माजी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, नगरपरिषदेचे अभियंता स्वागत बिरंबोळे, आरोग्य निरीक्षक अभिमन्यू येळवंडे,वरीष्ठ लिपिक प्रवीण सुर्वे, राजेश रांजणे, ज्ञानेश्वर सदगिर, लेखापाल अंकुश इचके, संदेश कदम, उमेश मोरे, लक्ष्मण दरवडा, वर्तक, अजय साळुंखे, अन्सार महापुळे, एस.आई. नरेंद्र सावंत, सुशांत नाईकडे यांसह अन्य कर्मचारी वर्गाने यासाठी परिश्रम घेतले.

## भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७३ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । तळा**

भारतीय प्रजासत्ताक ७३ वा वर्धापन दिनाचा तळा तालुक्यातील शासकीय ध्वजरोहणाचा मुख्य कार्यक्रम २६ जानेवरी रोजी सकाळी ठिक ९.१५ वाजता तहसिल कार्यालयाच्या पटांगणात तहसिलदार अण्णापा कनशेट्टी यांच्या हस्ते ध्वजरोहण करुन मोठ्या उत्साहात पार पडले

यावेळी तळा तालुक्यातील पंचायत समिती सभापती अक्षरा कदम, उपसभापती गणेश वाघमारे, पोलीस निरिक्षक श्री. ओमासे, रवीभाऊ मुंढे, कैलास पायगुडे, चंद्रकांत रोडे, राकेशशेठ वडके, अॅड.निलेश रातवडकर, अॅड.चेतन चव्हाण, पत्रकार संजय रिकामे, संध्या पिंगळे,नगरपंचायत नवनिर्वाचित नगरसेवक, नगरसेविका शासकीय अधिकारी कर्मचारी वृंद मुख्याध्यापक शिक्षक वर्ग जेष्ठ आणि प्रतिष्ठीत नागरिक विद्यार्थी आणि तळेवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस निरिक्षक श्री. ओमासे यांच्या मार्गदर्शनाखाली परेड सादर करत तहसिलदार कनशेट्टी यांच्या हस्ते ध्वजरोहण करण्यात आले ध्वजरोहण झाल्यानंतर तहसिल कार्यालयात मान्यवरांची छोटेखानी बैठक पार पडली या बैठकीमध्ये तळा तालुक्यातील दिवंगत व्यक्तींना भावपुर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली तसेच तालुक्यातील विकासकामे आणि अडीअडचणी संदर्भात चर्चा करण्यात आली तहसीलदार यांनी सर्व मान्यवरांना प्रजासत्ताक दिनाच्या यावेळी पुन्हा शुभेच्छा दिल्या.

# कर्जतमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण उत्साहात

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यात ७३ व्या प्रजासत्ताक दिना निमित्त ध्वजारोहण करण्यात आले. या सोहळ्याच्या निमित्ताने होत असलेले शालेय विध्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम कोरोना संकटामुळे रद्द करण्यात आले होते. केवळ एनसीसीच्या विद्यार्थ्यांचे संचलन करण्यात आले. तालुक्यातील प्राथमिक शाळा, विद्यालये, महाविद्यालये, शासकीय कार्यालयांमध्ये कोरोनाच्या सावटाखाली ध्वजारोहण करण्यात आले.

पोसरी येथील आमदारांच्या शिवतीर्थ निवासस्थानी आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पोलीस मैदानात उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, पंचायत समिती मध्ये सभापती सुषमा ठाकरे यांनी ध्वजारोहण केले. नगरपरिषद कार्यालायातील ध्वजारोहण सोहळा नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी आमदार महेंद्र थोरवे यांच्यासह नगरसेवक व नागरिक मोठ्या संखेने उपस्थित होते.



तहसील कार्यालयात तहसीलदार विक्रम देशमुख, कर्जत पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे, कर्जत न्यायालयात न्यायाधीश मनोद तोकले, इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये डॉ. अनिरुद्ध जोशी, अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेमध्ये संस्थेचे कार्यवाह जनार्दन मोघे, कर्जत कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. शिरीष पाटील, कर्जत अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. विलास पिल्लेवान राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. मोहन काळे, भिसेगाव मधील आंबे भवानी माध्यमिक विद्यालयात माजी पंचायत समिती सदस्य पुंडलिक भोईर, वरई ग्रामपंचायतीमध्ये सरपंच सुरेश फराट, शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघात दत्तात्रेय भोईर यांनी ध्वजारोहण केले. कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये सुदाम कार्ले, सहकारी भात गिरणीत अरुण लाड यांनी ध्वजारोहण केले.

# मराठी मोठेपणा सांभाळा : डॉ.राजेंद्र थोरात

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

गोखले एज्यु.सोसायटीच्या श्रीवर्धन येथील कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे मराठी भाषा संवर्धन दिन वाङ्मय मंडळ व मराठी विभागांतर्गत साजरा करण्यात आला.महाविद्यालयात विविध उपक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या निर्बंधानुसार व निर्देशांनुसार संपन्न झाला.डॉ.राजेंद्र थोरात यांचे साहित्य व सिनेमा,डॉ.संजय मोरे यांचे माझी मराठीची बोलू कौतुके आणि डॉ.रविकांत शिंदे यांचे मराठी भाषेच्या विकासाचे आव्हान आणि उपाय या विषयांवर व्याख्यानांचे आभासी पद्धतीने आयोजन करण्यात आले होते.

शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांतील आव्हाने व सद्यः-स्थितीवर प्रकाश टाकण्यासाठी वैचारिक लेखन स्पर्धा,मुक्तव्यासपीठाच्या माध्यमातून निबंधस्पर्धा व काव्यलेखन स्पर्धांना विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आजच्या उदारीकरणाच्या या गतिमान स्पर्धेत इंग्रजीचे प्राबल्य व प्रभाव वाढत असून भारतीय संस्कृतीवर व मराठी भाषेवर प्रचंड आक्रमण होत आहे. किंबहुना मराठीची अस्मिता सांभाळणारी व मराठी बोलणारी व्यक्ती या विश्वात गावंढळ समजली जाते. ही वस्तुस्थिती आहे. म्हणून मराठीचे अनन्यसाधारण महत्व सिद्ध करण्यासाठी मराठी भाषा संवर्धन दिन साजरा करण्याची वेळ आली आहे. अशी भावना प्राचार्य डॉ.श्रीनिवास जोशी यांनी व्क्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.संतोष लंकेश्वर यांनी व सूत्र संचालन प्रा.शंकर भोईर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वाङ्मय मंडळ प्रमुख प्रा.शंकर भोईर, प्रा.संतोष लंकेश्वर, प्रा. मृण्मयी भुसाणे यांनी विशेष परिश्रम घेतले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : वयाळ, ता.खालापूर, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यावरील कब्जेदार सदरांत नमूद असलेल्या जमीन मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : वयाळ, ता.खालापूर, जि.रायगड येथील मिळकत**

| जमीन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्रफळ | आकार रु. |
|---|---|---|---|---|
| १) श्री.सदु रामा म्हात्रे<br>२) श्री.बाळु रामा म्हात्रे<br>३) श्री.जगन्नाथ रामा म्हात्रे<br>४) श्री.रघुनाथ रामा म्हात्रे<br>५) सौ.हिराबाई हरी कुरंगळे<br>६) श्रीमती.ठकुबाई गोविंद म्हात्रे<br>७) श्री.लक्ष्मण गोविंद म्हात्रे<br>८) सौ.मथुरा गणेश पाटील<br>९) सौ.भीमा भास्कर कोंडीलकर<br>१०) सौ.दक्षता दिलीप घरत | ७/ब | १४ | ०.३२.२०<br>पो.ख. ०.००.२०<br>एकूण क्षेत्र ०.३२.४०<br>त्यापैकी ०.१६.२०<br>एवढ्या क्षेत्राबाबत | १.०६ |

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारांस कोणाही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, लिज, लीएन, सदर मिळकतीतून जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचे पत्यावर लेखी नोंदवावी.

वरील विहित मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न प्राप्त झाल्यास नोटीसीत नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे व मिळकतीचे मालकांचे मालकी व वहिवाटी हक्कासंबंधात कोणताही वाद नाही असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची संबंधितांची नोंद घ्यावी. तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त होणारी हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

दि.२५/०१/२०२२

सही/-
**अॅड.सागर काशिनाथ कोंडीलकर**
**अॅडव्होकेट हायकोर्ट**
**ऑफिस : शॉप नं.२१, पहिला मजला महानगरपालिका कॉम्प्लेक्स, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, ज्याअर्थी मौजे : धारणी, ता.खालापूर, जि.रायगड येथील खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत श्री.दिपक महादेव गावडे यांच्या मालकीची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील असून सदर मिळकत कायम खरेदीखताद्वारे आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**शेतजमीन मिळकतींचे वर्णन**

**मौजे : धारणी, ता.खालापूर, जि.रायगड**

| मौजे/गाव | गट क्रमांक/सर्व्हे नं. | उपविभाग/हि.नं. | भु-धारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| धारणी | ८ | १ | भोगवटादार वर्ग-१ | ०.२८.९०<br>पो.ख. ०.०६.००<br>एकूण ०.३४.९० | ०.९१ |

येणेप्रमाणे सदरहू शेत जमीन मिळकतीचे वर्णन असून वर वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतीत अगर त्या मिळकतीचे कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचे अथवा कोणत्याही संस्थेचे, तिऱ्हाईतांचे गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करण्याबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, मालकी हक्क, ताबा हक्क, वहिवाटीचा हक्क, करारनामा, भाडेपट्टा, मृत्यूपत्र, पोटगी, बोजा, एम.ओ.यु., कोर्टाचा हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर तत्सम कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा हितसंबंधी व्यक्ती, संस्था व इतर त्यांची लेखी हरकती व आक्षेप जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आमच्या खालीलप्रमाणे पत्यावरील कार्यालयात प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने सादर करावे. विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत श्री.दिपक महादेव गावडे यांच्या मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील व मालकी हक्क-हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून व सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क-हितसंबंध नाहीत अथवा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहेत, असे गृहीत धरुन आमचे अशिल सदरचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या अशिलांवर व आमचे अशिलांच्या सदरच्या खरेदीखताच्या व्यवहारावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

स्थळ : उरण
दि.२६/०१/२०२२

सही/-
**अॅड.प्रविण बा. म्हात्रे**
**मिलन शॉपिंग सेंटर, शॉप नं.२८/२९, बी-विंग, ता.उरण, जि.रायगड, पिन-४००७०२**

मा.श्रीमती.गोडसे सो.कोर्ट

अॅड.एस.जी.पाटकर
अर्जदारातर्फे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.२०४५/२०२१
ने.ता. १०/०३/२०२२

१) सौ.सुनिता राजेंद्र कोळी
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) कु.मानसी राजेंद्र कोळी
वय : १९ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) कु.मानव राजेंद्र कोळी
वय : १८ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
सर्व रा.दिवाळे गाव, मच्छि मार्केट जवळ, सेक्टर १४,
कोकण भवन, सिबीडी, नवी मुंबई, बेलापूर-४००६१४ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

ज्याअर्थी वरील अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ व ३ चे वडील कै. राजेंद्र ज्ञानेश्वर कोळी हे दि.०९/०६/२०२१ रोजी मयत झाले असून अर्जदार हे त्यांचे प्रथम श्रेणीतील कायदेशीर वारसदार आहेत.

सदर मयत कै.राजेंद्र ज्ञानेश्वर कोळी यांचे आजोबा कै.लाला कोळी यांच्या मौजे : उलवे येथे मिळकती होत्या. त्यांचे कै.लाला कोळी यांचे पश्चात सदर मिळकतीत त्यांचा मुलगा व मयत कै.चंद्रभागा ज्ञानेश्वर कोळी हिचे वडील कै.नारायण लाला कोळी यांचा अविभाज्य हिस्सा होता व आहे. त्यामुळे सदर श्री.नारायण लाला कोळी मयत झाल्यानंतर त्यांचे हिश्श्यात त्यांची मुलगी म्हणून मयत कै.चंद्रभागा ज्ञानेश्वर कोळी यांचा अविभाज्य हिस्सा, हक्क व अधिकार होता व आहे. परंतु ते मयत झाल्याने सदर मिळकतीत त्यांचा असलेला हिस्सा त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारसदार म्हणून अर्जदारांना मिळावा म्हणून सदर मिळकतीत असलेल्या हिश्श्याबाबत अर्जदारांनी वारस दाखला मिळावा यासाठी अर्ज केला आहे. सदरच्या मिळकती खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| उलवे | १२१ ब | ६१ | ४ | १-६५-० |
| उलवे | १२१ फ | १०४ | ३+५+८ | ०-३२-० |

वर नमूद मिळकती नवी मुंबइ प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या आहेत. सदर संपादीत जमिनींच्या मोबदल्यात सिडकोच्या १२.५ टक्के योजनेंतर्गत सिडकोकडून भूखंडाचे वाटप केले जाते. सदरकामी भूखंड मिळणार आहेत.

त्याअर्थी कै.चंद्रभागा ज्ञानेश्वर कोळी यांचा वर नमूद मिळकतीत असलेला अविभाज्य हिस्सा व हक्कास अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारसदार असल्याबाबत अर्जदारान यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार घेतली जाणार नाही.

आज दि.२७/०१/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्याने दिली.

**सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**

### जाहीर सूचना

क्रं.अपील/डेस्क-१/आरटीएस/रिव्ही/३३८/२०२१
विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचे कार्यालय
जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई ४०००३२
दिनांक : १३/०१/२०२२

प्रती,
१) श्रीमती.अनुसया दगडू पाटील (मयत तर्फे वारस)
१) श्री.नारायण दगडू पाटील
२) श्री.वसंत दगडू पाटील
३) श्री.जगन दगडू पाटील
४) श्री.बबन दगडू पाटील
५) श्री.भाऊ दगडू पाटील
६) श्री.हरिश्चंद्र दगडू पाटील
७) श्रीमती.कविता यशवंत पाटील
८) श्रीमती.गीता अरविंद पाटील
वरील सर्व रा.लोणिवली,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ अपिलार्थी
विरुद्ध
१) मे.लि.व्हॅल्युएबल प्रॉपर्टीज प्रा.
तर्फे संचालक श्री.नरेंद्र हेटे
यांचे प्राधिकृत सिग्नेटरी
श्री.बिपीन दोशी
ऑफिस पत्ता : ४०८/४०९, भूमी लॅन्ड मार्क,
खांदा कॉलनी सिग्नल जवळ, सेक्टर १७,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.एकनाथ लडकू पाटील
३) श्री.पंढरीनाथ लडकू पाटील
४) श्री.काशिनाथ लडकू पाटील
५) श्री.चंद्रकांत लडकू पाटील
६) श्रीमती.रेणुका लडकू पाटील
७) श्रीमती.सुरेखा लडकू पाटील
८) भागिबाई लडकू पाटील
९) श्रीमती.भिमाबाई लडकू पाटील
१०) श्रीमती.यमुनाबाई सिताराम शेलके
११) श्री.रोहित जनार्दन मोकल
१२) श्रीमती.निकिता जनार्दन मोकल
वरील क्र.११ व १२ करिता अ.पा.क.
श्री.मोहन रामचंद्र मोकल
वरील २ ते १२ रा.पालीखुर्द, ता.पनवेल,
जि.रायगड-४१०२०६ सामनेवाले

विषय :- अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील हक्कनोंद अपिल क्र.१७५/१९, दि.११/०६/२०२१ चे विरुद्ध फेरतपासणी अर्ज

अपिलार्थी व सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील अपिल अर्जाची सुनावणी मा.अपर आयुक्त, कोकण विग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दि.०३/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

तरी वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीलामार्फत हजर रहावे. वरील तारखेस आपण हजर न राहिल्यास सदरहू फेरतपासणी / अपिल अर्जाचे कामी आपणास काही सांगणे नाही असे समजून योग्य तो हूकूम करण्यात येईल.

सही/-
**(धनंजय कांबळे)**
**नायब तहसीलदार (अपील)**
**अपर आयुक्त कोकण विभाग करिता**

# संक्षिप्त...

## प्रजासत्ताक दिनानिमित्त जोहे येथे ध्वजारोहण

**दै.रायगड नगरी । पेण**

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७२ व्या वर्धापन दिनानिमित्त न्यु इंग्लिश स्कुल व ज्युनिअर कॉलेज जोहे येथे प्राचार्य बि.एन.सांगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी दादर सागरी पोलीस स्टेशन, डॉ.आर.टी.धुमाळ इंग्लिश मिडीयम स्कुल, वंदे मातरम स्कुल, ग्रुप ग्राम पंचायत जोहे, ग्राम पंचायत कळवे, ग्राम पंचायत दादर, ग्राम पंचायत हमरापूर आदी ठिकाणी पोलीस निरीक्षक, विद्यमान सरपंच, उपसरपंच व सदस्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. न्यु इंग्लिश स्कुल व ज्युनिअर कॉलेज जोहे येथे कोरोनाचे सर्व नियम पाळून संपन्न झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रमास प्राचार्य बि.एन. सांगळे, स्कुल कमिटीचे बाबुराव मोकल, गोपीनाथ मोकल, लहू पाटील, अशोक मोकल, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, शंकर मोकल, नरेश मोकल, नितीन मोकल, पी.एन. पाटील, शिक्षकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.



## श्रमिक विद्यालय चिल्हे येथे प्रजासत्ताक दिनाचा सोहळा उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळाचे श्रमिक विद्यालय चिल्हे येथे प्रजासत्ताक दिनाचा सोहळा विविध प्रकारचे कार्यक्रमाने मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या सोहळ्याचे ध्वजारोहण संचालक धनाजी लोखंडे यांच्या हस्ते संपन्न करण्यात आले. यावेळी सचिव धोंडू कचरे, शा.समिती अध्यक्ष वसंत मरवडे, मुख्याध्यापक दिपक जगताप, नरेंद्र माळी व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला. कोरोना महामारीचे पार्श्वभूमीवर शासकीय नियमानुसार हा सोहळा साध्या पद्धतीने जरी संपन्न झाला असला तरी विद्यार्थी वर्गाचा उत्साह मात्र ओसंडून वाहत होता.

# संपन्न समर्थ सुदृढ भारतासाठी युवा वर्ग महत्वाचा : विठ्ठल डाके

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

आपल्या देशाचा कारभार लोकशाही मार्गाने चालत असल्याने लोकशाहीत मतदार हा महत्त्वाचा दुवा मानला जात आहे यासाठी नव तरुणांनी युवावर्गाने मतदार नोंदणी साठी पुढाकार घेऊन मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करण्यासाठी पुढाकार घ्यावा. समाजातील युवावर्गाने लोकशाही सशक्त व कणखर करण्यासाठी नवमतदारांनी मतदारयादीत नाव नोंदवून समर्थ सुदृढ भारत बनवण्यासाठी युवा वर्गाने महत्त्वाची कामगिरी बजावून योग्य उमेदवारांस निवडून देण्याचे आवाहन पनवेल महापालिकेतील उपायुक्त विठ्ठल डाके यांनी राष्ट्रीय मतदार दिना निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात केले कळंबोली येथे केले.



कळंबोलीतील शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना मार्फत कोरोना प्रतिबंधक नियमांचे काटेकोर पालन करून राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या दिना निमित्तान निबंध लेखन, घोषवाक्य लेखन आणि वक्तृत्व स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास पनवेल महापालिकेतील उपायुक्त विठ्ठल डाके, संपर्क अधिकारी विजय चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.सी. तसेच विद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक प्राध्यापक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा गौरविण्यात आले. त्यानंतर वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या पंचारत्ना पनाइ हिने मताधिकाराची सक्ती करावी का ? या विषयावर आपले परखड मनोगत केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजने मधील स्वयंसेविका मंजुश्री सुळे हिने केले. तसेच राष्ट्रगीत स्वयंसेविका कोमल जाधव हिने सादर केले. कार्यक्रमाअंती कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन स्वयंसेविका स्नेहा कुंभार हिने केले. कोविड १९ चे सर्व नियम पाळून यामध्ये ५२ व्यक्तिनी यामध्ये भाग घेतला तर ऑनलाईन पद्धतीने ८८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रम संयोजन डॉ.जाधव बी बी, डॉ भारती आरोटे व अनिता मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली एन.एस.एस. स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता.

# कर्जत व खालापूर तालुक्यातील विविध पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत विधानसभेचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हा सल्लागार बबन पाटील यांच्या उपस्थितीत विविध पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिव-सेनेत जाहीर प्रवेश केला आहे, प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी हा पक्ष प्रवेश झाला आहे.

कर्जत व खालापूर तालुक्यातील राष्ट्रवादी, काँग्रेस, मनसे कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माजी जिल्हा परिषद सदस्या पूजा थोरवे, प्रवीण थोरवे, कॉग्रेसचे माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पादिर, तसेच आदिवासी वाड्या वस्त्यांमधील अनेक नागरिकांनी, खालापूर तालुक्यातील महेश आगीवले, रितेश आगीवले व त्यांचे सहकारी तसेच मनसे माजी तालुका अध्यक्ष अंकुश तथा पप्पू शेळके व त्यांचे सहकारी यांनी आज शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

या पक्षप्रवेशामुळे मुळे भविष्य



काळात पक्ष संघटन मजबूत होणार असल्याचे मत आमदार महेंद्र यांनी या निमित्ताने व्यक्त केले. आपण सर्वांनी आज प्रजासत्ताक दिनी पक्षात प्रवेश केल्यानंतर आपला नेहमी यथोचित सन्मान भविष्यकाळात केला जाईल असे आश्वासन सुद्धा आमदार महेंद्र थोरवे यांनी यावेळी दिले.

या प्रसंगी जिल्हा सल्लागार बबन पाटील, जिल्हा सल्लागार भरत भगत, सहसंपर्क प्रमुख विजय पाटील, उपजिल्हा प्रमुख भाई गायकर, विधानसभा संघटक संतोष भोईर, संपर्क प्रमुख पंकज पाटील, तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, तालुका संघटक शिवराम बदे, सर्व उपतालुका प्रमुख, विभाग प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# समस्त महाजन संस्था, मुंबई यांचे मार्फत माथेरान मधील गरजवंताना ब्लँकेट वाटप

**दै.रायगड नगरी । माथेरान**

समस्त महाजन संस्था, मुंबई यांचे मार्फत माथेरानच्या नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांचे विनंती नुसार माथेरान मधील गरजवंत नागरिकांना प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून २६ जानेवारी २०२२ रोजी माथेरान मधील गरजवंताना एकूण २८० ब्लँकेटचे वाटप करण्यात येणार आले.

समस्त महाजन संस्था माथेरान साठी नेहमी वेगवेगळ्या प्रकारे स्थानिकांना नेहमी मदतीचा हात पुढे करत असतात. संस्थेचे चेअरमन गिरीशजी शहा, ट्रस्टी गिरीश सतरा, ट्रस्टी परेश शहा यांचे योगदान महत्वाचे आणि प्रशंसनीय आहे तसेच रंगोली हॉटेलचे डॉरीक नथवाणी यांचे विशेष सहकार्य नेहमी लाभत असते.ऐन थंडीच्या दिवसांत ब्लँकेट मिळाल्यामुळे अनेकांनी समाधान व्यक्त केले आहे. शिवसेना जनसम्पर्क कार्यालयात सकाळी १०:०० वाजले पासून या स्तुत्य कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. शिवसेना संपर्क प्रमुख प्रसाद सावंत यांनी समस्त महाजन संस्थेचे मनःपूर्वक आभार मानले. यावेळी सर्व आजी माजी पदाधिकारी, महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी तसेच कार्यकर्त्या, युवा सेनेचे पदाधिकारी, शिवसेना कार्यकर्ते, नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.



# उरण तहसिलदार कार्यालयासमोर प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात ७३ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध शासकीय कार्यालयांच्या ठिकाणी ध्वजारोहण करण्यात येऊन राष्ट्रीय ध्वजास मानवंदना देण्यात आली. तालुक्यातील मुख्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम काल उरण तहसिलदार कार्यालयासमोर तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उरण पोलिसांच्या शासकीय सलामीने राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. एकूणच कोविड - १९ आणि ओमायक्रॉनच्या प्रादुर्भावाची दक्षता पाळीतच सुरक्षित अंतर राखून मर्यादित नागरिकांच्या व शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत देशाच्या तिरंग्या झेंड्यास सलामी देण्यात आली.

ध्वजारोहणानंतर तहसिलदार यांच्या दालनात कोविड - १९ मध्ये नागरिकांचे कोविड संसर्गापासून संरक्षण करण्यासाठी व स्वतःचा जीव धोक्यात घालून अनेक कोरोना बधितांचे जीव वाचविण्यासाठी अहोरात्र प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे वैद्यकीय अधिकारी आणि उरण मधिल डॉक्टर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उरण तालुक्यातील राजकीय व स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी, हितचिंतक आणि महिला व नागरिक उपस्थित होते.




# २२ जुलैला वाहून गेलेल्या घागरकोंड पाणी योजनेचे भुमिपूजन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

रायगड जिल्हा परिषदेने आतापर्यंत अतिवृष्टीबाधित रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी निधी राखून वेळोवेळी रस्ते सुस्थितीत आणण्यासाठी खर्च केला. पण यंदा २२ जुलैच्या पावसाने जॅकवेल आणि पाणीयोजनेसाठीदेखील रस्त्याप्रमाणेच निधी राखून ठेवण्याची गरज स्पष्ट केली आहे. पोलादपूर तालुक्यातील असंख्य पाणी योजनांची हानी झाली असताना घागरकोंडच्या पाणी योजनेसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देत शेकापक्षाने भुमिपूजनाचा कार्यक्रम केला. याचप्रमाणे पर्यटकांचे आकर्षण असलेल्या घागरकोंडच्या झुलत्या पुलासाठीदेखील २० लाख रूपयांचा निधी मंजूर करण्यात येणार असल्याची ग्वाही रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष ॲड.आस्वाद पाटील यांनी येथे दिली.

पोलादपूर तालुक्यातील बोरावळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील घागरकोंड येथील जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजना करण्याच्या कामाचा भुमिपूजन समारंभ रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष ॲड.आस्वाद पाटील यांच्याहस्ते शेकापक्षाच्या देवळे राजिप गटाच्या सदस्या सुमन कुंभार यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी पोलादपूर पंचायत समितीच्या सभापती नंदा चांदे, उपसभापती शैलेश सलागरे, शेकापक्ष तालुका चिटणीस एकनाथ गायकवाड, बोरावळे ग्रुपग्रामपंचायत सरपंच वैभव चांदे, माजी सरपंच निवृत्ती उतेकर, पुरोगामी युवक संघटना चिटणीस चंद्रकांत सणस, योगेश महाडीक, समीर चिपळूणकर, बापू जाधव, बबन साने, अजित कंक, यासिन करबेलकर तसेच पाणीपुरवठा कमिटी अध्यक्ष रामचंद्र मोरे व ग्रामस्थ तसेच महिला उपस्थित होते.

पोलादपूर तालुक्यातील विकासकामे करणाऱ्या शेकापक्षासोबत जनतेनेही ठाम राहिल्यास गावागावांचा विकास होईल, असे सांगताना ॲड.आस्वाद पाटील यांनी राजकारण बदलत राहात असून आज




आम्ही जिल्हा परिषदेत आहोत पण अर्थसंकल्प मुख्यकार्यकारी अधिकारी मांडतील अशी परिस्थिती प्रशासक लागल्यास निर्माण होणार आहे. पुढील काळात आम्ही असू अथवा एकनाथ गायकवाडसारखे नवीन सदस्यही सभागृहामध्ये असतील, तर कामे होत राहतील असा आशावाद व्यक्त करून पोलादपूर तालुक्यात भुमिपूजनाला बोलविले की उदघाटनाला शुभारंभालाही बोलवले जाते कारण शेकापक्षाचे कार्यकर्ते कामे पूर्ण करतात इतरांसारखी नुसतीच बिले काढत नाहीत, अशी कोपरखळीही मारली.

यावेळी तालुका चिटणीस एकनाथ गायकवाड यांनी, पोलादपूर तालुक्यातील देवळे आणि कोंढवी जिल्हा परिषदेच्या मतदार संघातून शेकापक्ष स्वबळावर लढू शकेल, अशी कामे दोन्ही बाजूला केली असून निवडणुकीवेळी जसा पक्षश्रेष्ठी आदेश देतील, तशाप्रकारे सज्ज असू असे ठामपणे सांगितले. यावेळी रानवडीचे निवृत्ती उतेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे लक्ष्मणबुवा खेडेकर यांनी विचार मांडले. याप्रसंगी रायगड जिल्हा परिषदेचे ग्रामीण पाणीपुरवठा योजनेचे तसेच बांधकाम विभागाचे अभियंताही उपस्थित होते.

# कोकण कृषी विद्यापीठ व आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्थेत समन्वयाची गरज : डॉ. अजय कोहली

**दै.रायगड नगरी । कर्जत**

सर्वसामान्य व्यक्तिंच्या आहारात मुख्य अन्न म्हणून वापरल्या जाणाऱ्या भाताच्या सुधारासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ व आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्था, फिलिपाईन्स यांच्यात समन्वयाची गरज आहे, असे प्रतिपादन जागतिक संशोधन संचालक व आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्था, फिलिपाईन्सचे उपमहासंचालक डॉ. अजय कोहली यांनी येथे केले. प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सह्याद्री अतिथीगृहातील सभागृहात ' ५६ वी महाराष्ट्र राज्य वार्षिक भात गटचर्चा ' आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत हे होते.



व्यासपीठावर सन्माननीय अतिथी म्हणून आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्थेचे संशोधन आणि भागीदारीसाठी दक्षिण आशियाचे नवी दिल्ली येथे सल्लागार असलेले डॉ. उमाशंकर सिंग, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. पराग हळदणकर, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. रमेश कुणकेरकर, सहयोगी संशोधक संचालक डॉ. शिवराम भगत व भात विशेषज्ञ डॉ. भरत वाघमोडे उपस्थित होते. डॉ. कोहली पुढे म्हणाले की, सर्वसामान्य शेतकऱ्याचे सामाजिक व आर्थिक जीवनमान उंचावणे हे शास्त्रज्ञाचे ध्येय असले पाहिजे. ग्राहकांच्या पसंतीस उतरणाऱ्याच भात जाती शेतकरी पिकवतात असे नमूद करीत ते म्हणाले की, सामान्य व्यक्ती आपल्या आहारात ज्या भात जाती अन्न म्हणून प्रामुख्याने वापरतात त्या विकसित करण्याची गरज आहे. डॉ. उमा शंकर सिंग म्हणाले की, भात वाण प्रसारणापूर्वी शेतकऱ्यांना सामील करून प्रयोग आयोजित करायला हवे. अनेक वाणांची निर्मिती झाली असली तरी ते शेतकऱ्यांकडून उत्पादित केले जात नाही अथवा लोकप्रिय झालेले नाही. भारतात वाण बदलण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. भात पैदासकारांनी फक्त वाणनिर्मिती न करता जागरुकताही निर्माण करायला हवी, असे त्यांनी नमूद केले. डॉ. संजय सावंत यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर विख्यात दोन्ही शास्त्रज्ञांच्या उपस्थितीबाबत त्यांना हार्दिक धन्यवाद दिले व सदर दोन्ही शास्त्रज्ञ विद्यापीठातील सर्व शास्त्रज्ञांना कोणत्याही प्रकारची शास्त्रीय मदत अथवा पायाभूत सुविधा देण्यास उपलब्ध असतील, असे आश्वस्त केले. भात शेती शाश्वत व फायदेशीर होण्यासाठी सर्व शास्त्रज्ञांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन करीत मोजक्याच सुविधांमध्ये ' स्पीड ब्रिडींग ' सुरू केल्याबद्दल त्यांनी त्यात सामील कर्जतच्या शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाला कीटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आनंद नरंगलकर, जैवतंत्रज्ञान विभाग प्रभारी डॉ. संतोष सावर्डेकर, शिरगाव कृषी संशोधन केंद्राचे प्रभारी डॉ. विजय दळवी, पनवेल खार जमीन शास्त्रज्ञ डॉ. किशोर वैद्य, कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक डॉ. मनिष कस्तुरे हे व्यक्तीशः तर महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठातील ३५ अधिकारी व भात शास्त्रज्ञ दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी केले. आभार सहा. भात विशेषज्ञ डॉ. प्रवीण वनवे यांनी मानले.

# रोटरॅक्ट क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचा अनोखा उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोटरॅक्ट क्लब ऑफ पनवेल सेंट्रल ह्यांच्या वतीने कन्या दिवस म्हणून सेनेटरी नेपकीन व सेल्फ डिफेन्स हा उपक्रम करण्यात आला.

रोटरॅक्ट क्लब ऑफ पनवेल सेंट्रल हा क्लब २६ डिसेंबर, २०१६ पासून कार्यरत आहे. वर्ष २०२१-२२ साठी क्लब अध्यक्षा प्रियांका कुलकर्णी ह्या कार्यभार उत्तम प्रकारे सांभाळत आहे. वर्ष २०२१ सुरुवाती पासून क्लब ने ४५ ह्याहून अधिक सुंदर उपक्रम राबवले. तसेच पोलीस ठाण्यात जाऊन वृक्षारोपण, युवा दिन, श्वानांना दूध देऊन काळजी घेणे, सॅनिटरी पॅड वाटप, मॉडेल युनायटेड नेशन्स कॉन्फेरन्स, पनवेल मधील ९ सशक्त स्त्रीयांचा आदिशक्ती उपक्रमा द्वारे सन्मान, पुरुष दिन, इस्त्रायल तलाव स्वच्छता मोहीम, पौष्टिक अन्न वाटप अशे अनेक उपक्रम राबवण्यात आले.


श्री.विनायक जगे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!



* शुभेच्छुक *
जागृत एंटरप्रायझेस
रिअल इस्टेट कन्संलन्ट
गाळा नं.७, कनक सरोवर, जुना ठाणा नाका, प्रांत ऑफिस जवळ, पनवेल-४१०२०६